



दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ११२
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, बुधवार, दि.०४ डिसेंबर २०२४

## उच्चशिक्षित तरुण अमली पदार्थ विक्री प्रकरणात गजाआड

### २० लाखांचे अमली पदार्थ सिंहगड रस्ता परिसरातून जप्त



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०३, पुणे :** शहरात अमली पदार्थांची विक्री करणाऱ्या तस्करांवर पोलिसांनी करडी नजर ठेवली आहे. सिंहगड रस्ता परिसरात अमली पदार्थ विक्रीसाठी आलेल्या उच्चशिक्षित तरुणांना गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने पकडले. त्यांच्याकडून ओजीकुश गांजा, मेफेड्रोन असा १९ लाख ४५ हजार रुपयांचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले.

अंशुल संतोष मिश्रा (वय २७, रा.बुलडाणा), आर्श उदय व्यास (वय २५, रा. पंतनगर,घाटकोपर, मुंबई), पियूष शरद इंगळे (वय २२, रा. स्पाईन रोड, चिखली, पिंपरी- चिंचवड) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. अंमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक सुदर्शन गायकवाड, पोलीस निरीक्षक उल्हास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पथक सिंहगड रस्ता परिसरात गस्त घालत होते. त्यावेळी नऱ्हे परिसरातील भुमकर चौकात तिघे जण अमली पदार्थांच्या विक्रीसाठी येणार असल्याची माहिती पोलीस कर्मचारी संदीप शिर्के यांना मिळाली. पोलिसांच्या पथकाने सापळा लावून मिश्रा, व्यास आणि इंगळे यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून ओजीकुश गांजा, १५ ग्रॅम मेफेड्रोन आणि ६२ मिलीग्रॅम एल.एस.डी. असे अमली पदार्थ आढळून आले.

आरोपी अंशुल मिश्राने एका महाविद्यालयातून शिक्षण पूर्ण केले आहे. त्याचा साथीदार आर्श व्यास एका विमान कंपनीत कामाला (ग्राऊंड स्टाफ) होता. पियूष इंगळे याने संगणक अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहआयुक्त रंजनकुमार शर्मा, अतिरिक्त आयुक्त शैलेश बलकवडे, उपायुक्त निखील पिंगळे, सहायक आयुक्त गणेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली अमली विरोधी पथकाचे सहायक पोलीस निरीक्षक अनिकेत पोटे, पोलीस उपनिरीक्षक दिगंबर कोकाटे, सचिन माळवे, विनायक साळवे आदींनी ही कारवाई केली.

## पत्नीला फिनेल पाजून जीवे मारण्याचा प्रयत्न




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०३, डोंबिवली (ठाणे) :** घरातील सावत्र मुलीला मी सांभाळणार नाही. या कारणावरून झालेल्या भांडणातून रविवार, दिनांक ०१ डिसेंबर रोजी दुपारी कल्याण पूर्वेतील न्यू गोविंदवाडी भागात एका पतीने आपल्या पत्नीला फिनेल पाजून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. या महिलेची बहीण आणि शेजाऱ्यांनी धावपळ करून या महिलेला तातडीने रुग्णालयात दाखल केले. या घटनेनंतर या महिलेचा पती घरातून पळून गेला. या महिलेच्या तक्रारीवरून टिळकनगर पोलिसांनी पती विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या महिलेने पोलीस ठाण्यातील तक्रारीत म्हटले आहे, आपले दुसरे लग्न आपणास मारहाण करणाऱ्या पतीबरोबर झाले आहे. आम्हाला दोन मुले आहेत. पहिल्या पतीपासून आपणास एक मुलगी आहे. सावत्र मुलीला घेऊन पती ऑगस्टमध्ये त्यांच्या उत्तरप्रदेशातील गावी गेले होते. तेथे पतीच्या कुटुंबीयांनी सावत्र मुलीला विविध प्रकारचा त्रास देऊन तिला चटके दिले होते. त्याच्या खुणा तिच्या शरीरावर दिसत होत्या. सावत्र मुलीला झालेल्या त्रासाबद्दल आपण आपल्या पतीला जाब विचारला. त्यावेळी संतप्त झालेल्या पतीने पत्नीला माझी दोन मुले मला देऊन टाक. मी तुझ्या पहिल्या पतीपासूनच्या मुलीला सांभाळणार नाही, असे सांगितले.

महिलेला लहान बाळ असल्याने तिने पतीला मुल देण्यास नकार दिला. त्याचा राग येऊन पतीने पत्नीला शिवीगाळ करत मारहाण केली. रागाच्या भरात घरातील फिनेलची बाटली जबरदस्तीने महिलेच्या तोंडात ओतून तिला जीवे मारण्याचा प्रयत्न केला. फिनेलचा काही अंश तोंडात गेल्याने महिलेला उलटी झाली. यावेळी घरात ओरडा झाल्याने शेजारी धाऊन आले. पीडित महिलेने हा प्रकार आपल्या बहिणीला सांगितला. बहिण व शेजाऱ्यांनी तातडीने महिलेला टिळकनगर पोलीस ठाणे आणि तेथून पालिकेच्या शास्त्रीनगर रुग्णालयात उपचारासाठी नेले. तेथे तिच्यावर तातडीने उपचार करण्यात आले. या घटनेनंतर महिलेचा पती घरातून पळून गेला. पोलिसांनी पती विरुध्द महिलेच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला आहे.

## टेस्ट ड्राईव्ह घेण्याच्या बहाण्याने दुचाकी चोरी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०३, ठाणे :** टेस्ट ड्राईव्ह करून येतो असे सांगत दुचाकीच चोरी केल्याचा प्रकार भिवंडीत उघडकीस आला आहे. याप्रकरणी सोमवारी निजामपूरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निजामपूरा भागात फसवणूक झालेल्या व्यक्तीचे दुचाकी विक्रीचे शो-रुम आहे. उस्मानाबादमध्ये राहणारा व्यक्ती त्यांच्या परिचयाचा असून सुमारे आठवडाभरापूर्वी तो मित्रासोबत शो-रुममध्ये दुचाकी खरेदीसाठी आला होता. त्यांना ६० हजार रुपये किमतीची एक दुचाकी पसंत पडली.

त्यामुळे टेस्ट ड्राईव्ह करून येतो असे दोघांनी शो-रुम मालकाला सांगितले. मालकाने परवानगी दिल्यानंतर दोघेही दुचाकी घेऊन निघून गेले. परंतु ते परतलेच नाही. आठवडा उलटूनही दोघेही परतले नसल्याने त्यांनी दोघांविरोधात निजामपूरा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# देवेंद्र फडणवीस एकनाथ शिंदेंच्या भेटीला 'वर्षा'वर...

## सत्तास्थापनेचा तिढा सुटणार?; बैठकीत काय निर्णय होणार?



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०३ :** विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला बहुमत मिळाल्यानंतर राज्यात महायुतीचं सरकार स्थापन करण्यासाठी नेत्यांमध्ये हालचाली सुरू आहेत. ५ डिसेंबर रोजी नव्या सरकारचा शपथविधी सोहळा पार पडणार असल्याचं ही सांगितलं जात आहे. मात्र, हे सर्व सुरु असताना विधानसभेचा निकाल लागून ८ दिवस झाले तरी अद्याप सरकार स्थापन न झाल्यामुळे महायुतीत सर्व काही अलबेल नसल्याची चर्चा आहे. यातच महायुतीत शिंदेंची शिवसेना आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीत मंत्रिमदावरून रस्सीखेच सुरु असल्याचं बोललं जात आहे. तसेच एकनाथ शिंदे हे गृहमंत्री पदासाठी आग्रही आहेत, तर गृहमंत्री पद सोडण्यास भाजपा तयार नसल्याचं सांगितलं जात आहे.

या पार्श्वभूमीवर काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांची दिल्लीत गृहमंत्री अमित शाह यांच्याबरोबर बैठक देखील पार पडली होती. मात्र, या बैठकीनंतरही महायुतीमधील तिढा सुटला नाही अशी चर्चा आहे. यातच एकनाथ शिंदे हे गेल्या दोन दिवसांपासून आजारी आहेत. तसेच त्यांनी रुग्णालयात दाखल होत उपचार घेतल्याचं सांगण्यात आलं. त्यानंतर आज एकनाथ शिंदे हे वर्षा या निवासस्थानी दाखल झाले. वर्षा निवासस्थानी दाखल झाल्यानंतर भाजपाचे नेते गिरीश महाजन यांनी एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. त्यानंतर आता देवेंद्र फडणवीस यांनी स्वत: वर्षा निवासस्थानी जाऊन एकनाथ शिंदेंची भेट घेतली. या भेटीत एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यामध्ये जवळपास आर्धा तास चर्चा झाली. त्यामुळे या भेटीत नेमकी काय चर्चा झाली? याचा तपशील अद्याप समोर आलेला नाही. मात्र, या भेटीनंतर तरी महायुतीतील तिढा सुटणार का? मंत्रिपदांचा आणि खातेवाटपाचा तिढा सुटणार का? याकडे राज्याचं लक्ष लागलं आहे. दरम्यान, शिंदे आणि फडणवीसांच्या भेटीवरून शिंदे गटाचे प्रवक्ते किरण पावसकर यांनी प्रतिक्रिया देत फडणवीसांनी भेट का घेतली? याविषयी माहिती सांगितली आहे.

**किरण पावसकर काय म्हणाले?**

एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. महायुतीमध्ये कधीही नाराजी नव्हती आणि नाही. नाराजीचा काही प्रश्न नाही. एकनाथ शिंदे यांची तब्येत व्यवस्थित नव्हती. त्यामुळे ते रुग्णालयात दाखल झाले होते. मात्र, माध्यमात चर्चा झाल्या की ते नाराज आहेत. महाराष्ट्रातील जनतेने भरभरून एवढं त्यांना मतदान केलं. तसं येणारा कार्यक्रम देखील मोठा व्हावा आणि त्यामध्ये शिवसेना देखील असणार आहे, असं किरण पावसकर यांनी म्हटलं.

# नागपुरातील बर्डी उड्डाण पुलावर १५ वाहने एकमेकांवर धडकली



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०३, नागपूर :** सीताबर्डीतील गोवारी उड्डाणपुलावर भीषण अपघात झाला असून जवळपास १२ ते १५ वाहने एकमेकांवर धडकली.

या अपघात दोन जण जखमी झाले असून वाहनांचेसुद्धा मोठे नुकसान झाले आहे.

वाहतूक पोलीस आणि सीताबर्डी पोलिसांनी पुलावर पोहचून अपघातग्रस्तांना मदत केली. वाहतूक बंद करुन रस्ता मोकळा केला. ही घटना मंगळवार, दिनांक ०३ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११.३० वाजताच्या सुमारास घडली. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, वामन बापूराव नेवारे (४५, मटकाझरी) हे मंगळवारी सकाळी कारने उमरेडला जात होते.बर्डीच्या गोवारी उड्डाणपुलावरून जात जात असताना समोरील कारने अचानक ब्रेक दाबले. त्यामुळे मागे असलेल्या वामन नेवारे यांची कार पुढील वाहनावर आदळली व आडवी झाल्यामुळे मागून येणारी दुसरी कार नेवारेंच्या कारवर धडकली. त्यानंतर उड्डाणपुलावरून सुसाट जाणारी वाहने एकमेकांवर धडकायला लागली. काही सेकंदातच उड्डाणपुलावरील जवळपास १२ ते १५ वाहने एकमेकांवर धडकल्या. यामध्ये काही ऑटो, कार, आयशर ट्रक आणि एका स्कूलव्हॅंनचा समावेश आहे. या विचित्र अपघातामुळे उड्डाणपुलावरुन जाणारी वाहतूक विस्कळीत झाली. या अपघातात नेवारे यांच्यासह राजेश शेंडे (चिमुरकर लेआऊट, हुडकेश्वर) हेसुद्धा किरकोळ जखमी झाले. काही मिनिटातच उड्डाणपुलावर वाहनांच्या मोठ्या रांगा लागल्या.

सीताबर्डी पोलीस आणि वाहतूक पोलिसांचे पथक काही मिनिटातच उड्डाणपुलावर आले. त्यांनी अपघातग्रस्त वाहनांना एका बाजूला करण्याचा प्रयत्न केला. गाड्या एकमेकांवर धडकल्यामुळे काही वाहनचालकांमध्ये वाद सुरु होते. चालकांशी संवाद साधून त्यांची समजूत घातली. शेवटी या अपघाताची नोंद सीताबर्डी पोलीस ठाण्यात करण्यात आली.

दोन तास वाहतूक ठप्परहाटे कॉलनी चौक ते थेट झिरो माईल चौकात पोहचण्यासाठी गोवारी उड्डाणपूल तयार करण्यात आला आहे. मात्र, कार एकमेकांवर धडकल्याने झालेल्या अपघातामुळे उड्डाणपुलावरील वाहतूक जवळपास दोन तास ठप्प झाली होती. त्यामुळे उड्डाणपुलाखालील मार्गावर वाहनांची मोठी गर्दी होती. जनता चौक, पंचशील चौक आणि व्हेरायची चौकात वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. त्यामुळे वाहतूक पोलिसांचे दोन पथके उड्डाणपुलाखाली तैनात करण्यात आली होते.

# कर्जतच्या फेर मतमोजणीला आयोगाचा ग्रीन सिग्नल; अपक्ष उमेदवार सुधाकर घारे यांची मागणी मान्य



**अक्षराज : मानसी कांबळे**

**दि.०३, खालापूर :** कर्जत विधानसभा मतदारसंघात अपक्ष निवडणूक लढलेले सुधाकर परशुराम घारे यांचा ५ हजार ६९४ मतांनी पराभव झाला. शिवसेना महायुतीचे महेंद्र थोरवे यांना घारे यांनी अटीतटीशी लढत दिली होती.

मात्र, या निसटत्या पराभवाने त्यांच्या मनात शंकेची पाल चुकचुकली आहे. त्यामुळे त्यांनी फेर मतमोजणीची मागणी केली होती. ही मागणी मान्य झाली असून आता कर्जत मतदारसंघात पुन्हा मतमोजणी होणार आहे. त्यामुळे या फेरमोजणीत काय निकाल लागतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

कर्जत खालापुर मतदारसंघातील जनता महेंद्र थोरवे यांच्या विरोधात होती. जनतेला बदल हवा होता. त्यामुळे मतदानाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कर्जत खालापूरमधील जनता आम्ही सुधाकर घारे यांना मतदान केल्याचे सांगत असताना निकाल वेगळा लागला कसा लागला? असा प्रश्न सुधाकर घारे यांनी उपस्थित केला आहे.

खोपोलीमध्ये मतदानाच्या दिवशी बोगस मतदान झाल्याचे निवडणूक अधिकाऱ्यांनी कबूल केल्याचा सुधाकर घारे यांचा दावा आहे. असे अनेक संशयास्पद मुद्दे दाखवून सुधाकर घारे यांनी निवडणूक आयोगाकडे फेरमतमोजणीची मागणी केली होती.

विधानसभेसाठी २० नोव्हेंबरला मतदान झाले आणि २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी झाली. या निवडणुकीत कर्जत-खालापूर मतदारसंघातून शिवसेनेचे विजयी महेंद्र थोरवे यांना ९४ हजार ८७१ मते मिळाली तर दुसऱ्या क्रमांकांची ८९ हजार १७७ मते सुधाकर घारे यांना मिळाली आहेत. घारे यांचा अवघ्या ५ हजार ६९४ मतांनी पराभव झाला. एकूण २६ पैकी २२ फेऱ्यांमध्ये सुधाकर घारे आणि विजयी उमेदवार महेंद्र थोरवे यांच्यात जोरदार रस्सीखेच होती.

खोपोली नगरपालिका हद्दीत थोरवे यांनी आघाडी घेतल्याने खोपोलीत काहीतरी गडबड झाल्याचा संशय व्यक्त होत आहे. त्यामुळे घारे यांनी फेर मतमोजणीची मागणी केली होती. निवडणूक आयोगाने सुधाकर घारे यांची मागणी मान्य केली आहे.

आता ही मतमोजणी कधी होणार आणि फेरमोजणीनंतर निकालात काही फरक पडेल का, याची सर्वांना उत्सुकता लागली आहे.




## गणेशोत्सवात विधायक कामे करावीत

लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू करून आज १३० वर्ष झाली. इंग्रजांच्या राजवटीत भारतीय संस्कृतीची उघड उघड विटंबना होत होती. इंग्रजांच्या दमनशाही विरुद्ध तरुण एकत्र यायला तयार नव्हते. तरुणांना एकत्र आणल्याशिवाय इंग्रजांविरुद्ध लढा देणे अशक्य आहे हे ओळखून लोकमान्य टिळकांनी तरुणांना एकत्र आणण्यासाठी व त्यांच्यात देशभक्तीची मशाल पेटवण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. हळूहळू सार्वजनिक गणेशोत्सव ही महाराष्ट्राची परंपरा बनली. आजही ती परंपरा मोठया भक्तिभावाने जोपासली जाते. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेला सार्वजनिक गणेशोत्सव महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात गणेशोत्सव मोठ्या जल्लोषात साजरा केला जातो. गणेशोत्सव हा महाराष्ट्राचा मानबिंदू आहे. गणेशोत्सव महाराष्ट्राची ओळख आहे. लवकरच गणेशाचे आगमन होणार आहे. गणेशोत्सवाच्या दहा दिवसांच्या कालावधीत सर्वच गणेशभक्त गणेशाची मनोभावी पूजा करतात. सर्वत्र उत्साहाचे आणि जल्लोषाचे वातावरण असते मात्र अलीकडच्या काळात गणेशोत्सवाचे हे स्वरूप बदलू लागले आहे. टिळकांनी ज्या उद्देशाने हा सण सुरू केला तो उद्देशच आता हरपला आहे. इतकेच काय पण या उत्सवाचे पावित्र्यही कमी होऊ लागले आहे. आज गणेशोत्सव हा उत्सव न राहता इव्हेंट बनला आहे. उंचच उंच मूर्तींची जणू स्पर्धाच सुरू झाली आहे. या मोठ्या मुर्त्या समुद्राच्या पाण्यात विसर्जित करताना दोरीच्या साहाय्याने बांधाव्या लागतात. उंचच उंच मूर्तीचे अवडंबर न माजवता पर्यावरण पूरक गणेश मूर्ती खरेदी करून तिची प्राणप्रतिष्ठा करावी. शास्त्रानुसार शाडूच्या मातीने गणेश मूर्ती बनवावी, असे सांगितले आहे असे असतानाही सर्रास प्लॅस्टर ऑफ पॅरिसपासून मुर्त्या बनवल्या जातात. या मुर्त्या पाण्यात विरघळत नसल्याने पाण्याचेही प्रदूषण होते. गणेशोत्सवाच्या दहा दिवसांत ध्वनी प्रदूषणही खूप वाढते. गणेशोत्सवात डॉल्बीच्या स्पीकरवर मोठमोठ्या आवाजात गाणी लावून चित्रपटांच्या गाण्यावर हिडीस नृत्य करण्याची फॅशन रूढ झाली आहे. या डॉल्बीचा आवाज इतका मोठा असतो की त्याचा परिणाम लहान मुले व जेष्ठ नागरिकांच्या श्रवण इंद्रियांवर होऊ शकतो. उत्सवाच्या नावाखाली वर्गणी उकळली जाते प्रसंगी धमकीही दिली जाते. त्यावरही गणेशभक्त नाराज आहेत. भक्तांनी जितकी वर्गणी दिली गणेश मंडळांनी तीच दान म्हणून स्वीकारावी. गणेशोत्सवात डोळे दिपवणारी रोषणाई केली जाते त्यामुळे विजेचाही अपव्यय होतो. तेंव्हा सजावटी रोषणाई यावर मर्यादा घालावी. काही सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे आपल्या मंडळाचे मार्केटिंग करत आहेत. नवसाला पावणारा गणपती अशी जाहिरात करून सिलेब्रेटींना बोलवले जाते. त्यातूनच मग मंडळा- मंडळामध्ये मतभेद होऊन तेढ निर्माण होते त्यातूनच मग कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. टिळकांनी गणेशोत्सव साधेपणाने साजरा करण्यास सांगितले आहे.

दुसऱ्यांना त्रास होऊ न देता गणेशोत्सव साजरा केला पाहिजे. गणेश मंडळांनी १० दिवसांच्या कालावधीत सामाजिक उपक्रम राबवले पाहिजेत. गणेश मंडळांनी समाजाला उपयोगी पडतील अशी विधायक कामे करावीत. रक्तदान शिबिर, दुष्काळग्रस्तांना, पूरग्रस्तांना मदत तसेच गरीब आणि कोरोना काळात पालक गमवलेल्या अनाथ मुलांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारावे. अनाथ आश्रम, वृद्ध आश्रमांना मदत करावी. गणेश मंडळांनी शालेय विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव दिला पाहिजे. मंडळांनी शालेय विद्यार्थ्यांच्या गीत गायन स्पर्धा, नृत्य स्पर्धा यांचे आयोजन करावे. गणेश ही बुद्धीची देवता आहे त्यामुळे विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता वाढीस लागेल असे उपक्रम राबवावेत. हा उत्सव जितका साधेपणाने साजरा केला जाईल तितकेच त्याचे पावित्र्य कायम राहील आणि भक्तांनाही त्याचा आनंद लुटता येईल.

# !! अरे बाबा, माती आहे अनमोल !!

## आंतरराष्ट्रीय माती - मृदा दिन सप्ताह विशेष

रासायनिक खते आणि किटकनाशकांचा बेसुमार वापर आणि पाण्याच्या अतिरिक्त वापराने जगभरातील अनेक सुपीक जमिनी अनुत्पादक बनल्या आहेत. त्यामुळे माती- मृदेच्या जैविक गुणांचा ऱ्हास होत आहे, मातीच्या प्रदूषणात वाढ होत आहे. त्याचा परिणाम जगातील अनेक देशांच्या अन्नसुरक्षेवर झाल्याचं दिसून आलंय. भारततही मृदेचा ऱ्हास मोठ्या प्रमाणात होत आहे. मृदेच्या संवर्धनासाठी भारत सरकारतर्फे सन २०१५ साली सॉइल हेल्थ कार्ड ही योजना सुरु करण्यात आली आहे. त्या माध्यमातून मृदेचे स्वास्थ्य टिकवणे, शेतीच्या शाश्वत विकास करणे आणि त्याद्वारे अन्नसुरक्षा करणे हा उद्देश आहे.

आपल्यासाठी का महत्वाचा आहे जागतिक मृदा दिवस? मृदेचे स्वास्थ्य टिकवणे आणि तिच्या शाश्वत व्यवस्थापनेच्या प्रक्रियेसाठी जागरुकता निर्माण करणे हा उद्देश जागतिक मृदा दिवस साजरा करण्यामागे आहे. माती हा अत्यंत महत्त्वाचा पण नेहमीच दुर्लक्षित राहिलेला स्त्रोत आहे. या घटकाकडे जगभरातील लोकांचे लक्ष वेधणे तसेच मातीच्या संवर्धनाची असलेली गरज याबाबत जनजागृती करणे यांसाठी हा जागतिक मृदा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. आरोग्यदायक माती हा आरोग्यदायक अन्न निर्मितीचा पाया आहे. विविध पिके आणि शेती यांचा पाया माती आहे. अन्नधान्याच्या ९० टक्के गरजा मातीद्वारेपूर्ण होतात. जंगले वाढविण्यासाठी मातीचीच आवश्यकता असते. पृथ्वीचा एक चतुर्थांश भाग विविध जीवांनी व्यापला असून ही जैव विविधता टिकवून ठेवण्यात मातीचा मोलाचा वाटा आहे. मातीमध्ये पाणी अडविण्याची, साठविण्याची आणि शुद्ध करण्याची क्षमता आहे. माती अमूल्य आहे. अन्न, वस्त्र व निवारा या आपल्या मुलभूत गरजा मातीशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. आधुनिक युगात मातीविना शेती यासारख्या संकल्पना उदयास आल्या असल्या तरी जगातील महाकाय लोकसंख्येचे पोट भरण्याचे सामर्थ्य यामध्ये नाही. माती कारखान्यांत तयार होत नाही. माती तयार होण्यासाठी हजारो वर्षाचा कालावधी लागतो. ऊन, वारा, पाऊस व पाण्याचा प्रवाह अशा विविध गोष्टींचा परिणाम खडकांवर झाला. खडकांची झीज होऊन माती तयार झाली. लाखो वर्षे ही प्रक्रिया सुरू होती. साधारण १ सेंमी मातीचा थर तयार होण्यासाठी हजारो वर्ष लागतात. या मातीमध्ये मृत प्राण्यांचे अवशेष प्राण्यांची विष्टा, कुजलेल्या वनस्पतींचे अवशेष असतात. सेंद्रिय पदार्थ व खनिज पदार्थ अशा दोन प्रकारच्या पदार्थांनी माती बनते. अनेक मातीचे कण मिळून जमीन तयार होते. जमिनीतील दहा ते पंधरा सेंमी मातीचा थर हा पृथ्वीवरील जीवांच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचा भाग असतो.

दरवर्षी ५ डिसेंबर रोजी जागतिक मृदा दिवस साजरा केला जातो. जागतिक अन्नसुरक्षेच्या दृष्टीने मृदेचं महत्व अन्यसाधारण असं आहे. अलिकडच्या काळात शेतीमध्ये वापरण्यात येणारी भरमसाठ रासायनिक खते, शहरीकरण आणि उद्योगधंद्यांसाठी करण्यात येणारी जंगलतोड आणि इतर अनेक कारणांमुळे मृदेची झीज होण्याची प्रक्रिया मोठ्या प्रमाणात सुरु आहे. केवळ एक इंच सुपीक मृदेचा थर तयार होण्यासाठी आठशे ते हजार वर्षांचा कालावधी लागतो. मानवाच्या बदलत्या जीवनशैलीचा परिणाम, पर्यावरणाचा ऱ्हास आणि अशा प्रकारच्या इतर अनेक कारणांमुळे मृदेची झीज मोठ्या प्रमाणावर होतेय. त्यामुळे यासंदर्भात जागरुकता करण्याच्या दृष्टीने सन २०१३ साली सयुंक्त राष्ट्राच्या महासभेत ५ डिसेंबर हा जागतिक मृदा दिवस साजरा करण्याचा संकल्प करण्यात आला. फूड अॅन्ड अॅग्रीकल्चर ऑर्गनायझेशन- एफएओ अर्थात अन्न आणि कृषी संघटनेच्या वतीनं या दिवसाचे आयोजन केलं जातं. शेतकऱ्यांसोबतच सामान्य माणसांमध्येही मृदेसंबंधी जागरुकता करण्याचा उद्देश त्यामागं आहे. दरवर्षी मृदा



दिवस साजरा करताना एक वेगळी थीम तयार केली जाते आणि वर्षभर त्या आधारे मृदा संवर्धनासाठी जागरुकता केली जाते. जसे- कीप सॉइल अलाइव्ह, प्रोटेक्ट सॉइल बायोडायव्हर्सीटी! म्हणजे मृदेला जिवंत ठेवा, मृदेच्या जैवविविधतेचे संरक्षण करा. त्या अशाप्रकारच्या थीम्स असतात.

भारताची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. परंतु वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण, धरण, रस्ते, आदी विविध कारणांमुळे सुपीक जमीन जात असल्याने लागवडीलायक क्षेत्रात घट होत आहे. एवढ्या मोठ्या लोकसंख्येला अन्नाची गरज भागविण्यासाठी अन्नधान्य उत्पादन वाढविणे गरजेचे आहे. शेत मशागतीच्या चुकीच्या पद्धती, बेसुमार जंगलतोड, अनिर्बंध चराई, वारा, जोराचा पाऊस आदी कारणांमुळे जमिनीची धूप होते. हजारो वर्षांनी बनलेला हा मातीचा थर नष्ट व्हायला अत्यल्प कालावधीही पुरेसा ठरतो. जमिनीची धुप झाल्यामुळे सुपीक माती वाहून जाते. सुपीक जमिनीबरोबर पाण्याच्या प्रवाहाबरोबर वाळू, खडकांचे बारीक तुकडे वाहत येतात व सुपीक भागात पसरतात. यामुळे सुपीक जमीन नापिक होण्याची शक्यता असते. मानवाने विज्ञान व तंत्रज्ञानातून कितीही प्रगती साधली, तरी एकदा नष्ट झालेली माती पुन्हा निर्माण करू शकत नाही हे वास्तव आहे. यासाठी लोकांमध्ये जागृती निर्माण करणे आवश्यक आहे. भविष्यात जमीन आरोग्याचे निदान करण्यासाठी माती परीक्षण तंत्रज्ञानाचा वापर अपरिहार्यच होणार असून या पुढील काळात जमिनीच्या आरोग्याकडे दुर्लक्ष केल्यास त्यांचे गंभीर परीणाम फक्त शेतीवरच न दिसता मानवी शरीर आणि प्राणी इत्यादींना सुद्धा जाणवणार आहेत. ते लक्षात घेऊनच केंद्र व राज्य शासनाच्या सहयोगाने राज्यात मृद आरोग्य पत्रिका वितरण कार्यक्रम सन २०१५-१६पासून राबविण्यांत येत आहे. या कार्यक्रमात टप्प्याटप्प्याने आगामी दोन वर्षाच्या कालावधीमध्ये सर्व गावांची निवड करुन सर्व शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीची आरोग्य पत्रिका देण्यात येत आहे. मृद आरोग्य पत्रिकेमध्ये जमिनीतील उपलब्ध अन्न द्रव्यांचे प्रमाण समजणार आहे. या बाबतच्या माहितीचा उपयोग शेतकऱ्यांना विविध पिकाना योग्य प्रमाणात संतुलीत खते देण्याकरीता होणार आहे. माती परीक्षणानुसार खताचे व्यवस्थापन केल्यास जमिनीचे आरोग्य टिकवून ठेवणे व पिकांचे उत्पादन वाढणे व खर्चाची बचत होणे यांस मदत होणार आहे. सर्व जिल्ह्यात मृद आरोग्य पत्रिका अभियान राबविणे आवश्यक असून यामध्ये बागायत क्षेत्रातून २.५ हेक्टरला १ प्रातिनिधीक मृद नमुना व जिरायत क्षेत्रातून दहा हेक्टरला एक प्रातिनिधीक नमुना घेतला जावा व त्या परीघ क्षेत्रामध्ये सामाविष्ट सर्व शेतकऱ्यांना मृद आरोग्य पत्रिका देण्यात याव्यात.

मृदेचं महत्व- मृदेचं संरक्षण म्हणजे संपूर्ण सजीवांचं संरक्षण असाच अर्थ होतोय. जगातील ९५ टक्के अन्नधान्य मृदेच्या माध्यमातून येतं. तसेच मृदेत पृथ्वीवरील एकूण सजीवांपैकी २५ टक्के सजीव आसरा घेतात. फळे, भाज्या आणि अन्नधान्याची गुणवत्ता ही मातीच्या गुणवत्तेवरुन ठरते. सद्या या मृदेच्या संवर्धनासमोर वातावरण बदलाचं मोठं आव्हान उभं आहे. मृदा प्रदूषण टाळायचं असेल तर काय करावं? अलिकडे मोठ्या प्रमाणावर मृदेचं प्रदूषण होताना दिसतंय. ते टाळायचं असेल तर काही पाऊलं उचलली पाहिजेत. प्लॅस्टिकचा वापर कमी केला पाहिजे. त्या ठिकाणी पर्यावरणपूरक उत्पादनांचा वापर करायला हवा. आपल्या वाया जाणाऱ्या खाद्य पदार्थांचं रुपांतर कंपोस्ट खतात करायला हवं. शाश्वत शेतीसाठी अन्नद्रव्यांचे योग्य व्यवस्थापन आणि जमिनीची सुपिकता यांचे अनन्यसाधारण असे महत्त्व आहे.

सेंद्रीय खतांच्या वापराचा अभाव, असंतुलित खत पुरवठा, पीक फेरपालटीचा अभाव इत्यादीमुळे जमिनींचे गुणधर्म बदलत असून मोठ्या प्रमाणावर अन्नद्रव्यांची कमतरता दिसून येत आहे. जमिनीची सुपीकता खालावत चाललेली असून तिचे आरोग्य बिघडत असल्याचे दिसून येत आहे. सेंद्रीय कर्बाचे जमिनीतील प्रमाण गांभीर्याने घटत चाललेले आहे. हवामान बदलाचा परिणाम म्हणून काही विपरीत बदल देखील जमिनीच्या गुणधर्मात होत असल्याचे दिसून येत आहे. परिणामी वापरण्यांत येणाऱ्या किंमती निविष्ठांचा प्रभावी वापर होत नसून फक्त खर्चात वाढ होऊन शेतीचा किफायतशीरपणा कमी होत आहे. वर्षानुवर्ष शेतकरी जमिनीत विविध पिके घेत आला आहे. पुर्वीच्या काळात सेंद्रिय पदार्थ मुबलक प्रमाणांत उपलब्ध होते व ते जमिनीत टाकण्याचे प्रमाणसुद्धा जास्त होते. त्यामुळे जमिनीत पोत टिकण्यांस आपोआपच मदत होत असे. देशाची लोकसंख्या वाढल्यामुळे अन्नधान्याची गरज वाढू लागली त्या प्रमाणात शेतामधून अधिक उत्पादन वाढविण्याकडे कल वाढत गेला. हरित क्रांतीनंतर अधिक उत्पादन देणाऱ्या तसेच संकरीत वाणांचा वापर मोठ्या प्रमाणात होत गेला. अधिक उत्पादन देण्यासाठी रासायनिक खतांचा वापर मोठ्या प्रमाणात सुरू झाला.

सिंचनाच्या विविध सोयी उपलब्ध झाल्यामुळे बागायत क्षेत्रात सर्व हंगामात पिके घेण्यात येऊ लागली. पर्यायाने पीक घनता वाढून रासायनिक खतांचा वापर मोठ्या प्रमाणात होऊ लागला. तसेच रासायनिक खतांच्या किंमती वाढल्यामुळे शेतकरी कमी किंमतीच्या खतांचा वापर करू लागला. रासायनिक खतांच्या असमतोल वापरामुळे काही मुलद्रव्यांची जमिनीत कमतरता जाणवु लागली. त्यामुळे मोठ्या प्रमाणात रासायनिक खतांचा वापर करुनही उत्पादकता वाढीस मर्यादा आलेल्या आहेत. जमीन हा मर्यादीत स्वरुपाचा नैसर्गिक स्त्रोत असल्यामुळे त्याची योग्य जोपासना करुन भविष्यातील गरजा पूर्ण करण्यासाठी जमिनीचे आरोग्य सुस्थितीत ठेवणे गरजेचे आहे. यासाठी स्थानिक गरजेनुसार योग्य व्यवस्थापन पद्धतीचे अवलंबन करण्याची गरज आहे. जमिनीच्या प्रकारानुसार पिकांची निवड, माती परीक्षणानुसार खतांचा संतुलित वापर, पिकांची फेरपालट, सेंद्रिय खतांचा नियमित वापर, इत्यादींचा वापर करुन जमिनीची सुपिकता टिकवुन ठेवणे आणि प्रति हेक्टरी उत्पादकता वाढविणे गरजेचे आहे. सर्व शेतकरी बंधुना विनंती आहे की, आपण आपल्या शेत जमिनीचे नियमीत माती परिक्षण करून आपल्या जमिनीची सुपिकता जाणून घ्यावी व त्यानुसारच पिकांना खताची मात्रा द्यावी. जेणे करुन जमिनीचे आरोग्य अबाधित ठेवून आपणास आधिक उत्पादन घेता येईल व जमीनीच्या आरोग्याबरोबरच मानवी आरोग्याचेही जतन होईल. चला तर मग, आपण सारे मिळून शासनाच्या मृद आरोग्य पत्रिका वितरण कार्यक्रमात सहभागी होवून साजरा करुया मृदा दिवस!

**!! आंतरराष्ट्रीय मृदा दिवसाच्या आठवडाभर सर्वांना सजगतेच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!**

- एक शेतकरीपुत्र -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.
गडचिरोली, मधुभाष- ७७७५०४१०८६.

## गांव तिथं राष्ट्रवादी शाखा उभारा - उपमुख्यमंत्री पवार; दाते परिवाराने घेतली भेट



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०२, पारनेर (अहिल्यानगर) :** मुंबई येथे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे देवगिरी बंगल्यावर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रथम अध्यक्ष व जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत दादा गायकवाड यांच्यासह अहिल्या नगर जिल्ह्यातील पारनेर विधानसभा मतदारसंघातील नवनिर्वाचित आमदार काशिनाथराव दाते सर यांच्या परिवाराने मा. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची मुंबई येथे देवगिरी बंगल्यावर भेट घेतली.

या भेटीवेळी पवार यांनी राजकीय मतभेद बाजूला ठेवून सर्वांनी विकास कामासाठी एकत्र यावे व विधानसभेप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत महायुतीच्या उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजय करावे असे सांगतानाच राष्ट्रवादी पक्षाची संघटना मजबूत करण्यासाठी सर्वांनी एक दिलाने प्रयत्न करावेत असे सांगितले. उपमुख्यमंत्री पवार यांच्या भेटीसाठी आमदार दाते यांच्या परिवारातील उद्योजक दिलीप दाते, डॉ. प्रदीप दाते, उद्योजक मंगेश दाते, उद्योजक राजेंद्र औटी, संजय शिरोळे, दिपक गडाख, ऍड. युवराज पाटील, सचिन दाते, अशोक आहेर, अर्जुन आहेर व दाते यांचे कायमचे सारथी असलेले राजू चव्हाण यांचा समावेश होता.

## विषारी केमिकल ताडी पिल्याने तरुणाचा मृत्यू



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील ढवळपुरी येथे ताडीने तरुणाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. रमेश मधुकर बर्डे असे मृत तरुणाचे नाव आहे. पोलिसांनी या प्रकरणी ताडीविक्रेत्यावर गुन्हा दाखल करावा. ढवळपूरी फाट्यावरील ताडीचा पुरवठा करणार्या दुकानाचा परवाना रद्द करावा. अशी मागणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी निवेदनाद्वारे केली आहे. जिल्हाधिकारी कार्यालय व राज्य उत्पादन शुल्क कार्यालयास दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, पारनेर तालुक्यातील ढवळपुरीतील रमेश मधुकर बर्डे हा युवक २५ नोव्हेंबरला वडिलांच्या दशक्रिया विधीचे साहित्य आणण्यासाठी गेला होता. त्याच्यासोबत मामाचा मुलगा अनिल गांगुर्डे हा देखील होता. सायंकाळी रमेश याने एका घरातून ताडी पिऊन दशक्रिया विधीचे साहित्य घरी आणले. घरी गेल्यानंतर त्याला उलटी होण्यास सुरुवात झाली व उलटी झाल्यानंतर तो बेशुद्ध पडला.

त्यानंतर त्याला जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले, तेथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. ताडी विक्रेत्याने बनवलेली विषारी केमिकलयुक्त ताडी पिऊन या युवकाचा मृत्यू झाला असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. रमेश बर्डे हा आदिवासी समाजातील असल्याने राजकीय लोक जाणीवपूर्वक हे प्रकरण दाबत आहेत. यापूर्वी ढवळपुरी येथील शिवराम भले याने देखील विषारी ताडीचे सेवन केल्याने तो मयत झाला. त्याचबरोबर काळू नदी, वनकुटे, गाजदीपूर, जामगाव येथील पाच ते सहा जणांचा देखील विषारी केमिकलयुक्त ताडी प्राशन केल्याने मृत्यू झाला आहे. पारनेरमध्ये विषारी ताडीने अनेकांचा जीव जात असताना पांगरमलची पुनरावृत्ती टाळण्यासाठी तातडीने दक्षता घेऊन कारवाई करावी. या प्रकरणी कारवाई न झाल्यास येत्या ९ डिसेंबरला पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर ऊपोषण करण्यात येईल, असेही निवेदनात म्हटले आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## परख सर्वेक्षणातून होणार विद्यार्थ्यांच्या क्षमतांचे मूल्यांकन

# ४ डिसेंबरपासून सर्व्हेक्षणाला सुरुवात; जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचा पुढाकार

**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.०३, धाराशिव :** शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे,विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामगिरीचे मूल्यमापन करणे आणि धोरणात्मक सुधारणा करण्यासाठी एन.सी.ई.आर.टी.या राष्ट्रीय शैक्षणिक संस्थेअंतर्गत नवीन शैक्षणिक धोरण - २०२० नुसार स्थापन झालेल्या PARAKH (performance assessment review and analysis of knowledge forholiestic development) या संस्थेमार्फत संपूर्ण देशामध्ये ७८२ जिल्ह्यांमधील ८८ हजारपेक्षा जास्त निवडक शाळांतील २३ लक्षपेक्षा अधिक विद्यार्थ्यांचे परख राष्ट्रीय संपादनूक सर्वेक्षण २०२४ चे आयोजन ४ डिसेंबर २०२४ रोजी करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील सर्व व्यवस्थापनाच्या व सर्व माध्यमांच्या शाळांमधीत तिसरीच्या ४३, सहावीच्या ४२ व नववीच्या ४९ अशा एकूण -१२० शाळांमधील १३४ वर्गातील विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण होणार आहे.या सर्वेक्षणाद्वारे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामगिरीचे मूल्यांकन केले जाईल. इयत्ता ३ री आणि ६ वी साठी भाषा, गणित आणि पर्यावरण अभ्यास हे विषय तर इयत्ता ९ वी साठी भाषा, गणित, सामाजिक शास्त्र आणि विज्ञान विषयांसाठी सर्वेक्षण चाचणी होणार आहे. सर्वेक्षणासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धाराशिवचे डॉ. प्राचार्य दयानंद जटनुरे व शिक्षणाधिकारी, (प्राथमिक) अशोक पाटील हे जिल्हा समन्वयक व संस्थेतील मूल्यमापन विभाग प्रमुख प्रा.डॉ.शोभा मिसाळ व प्रा.मिलिंद अघोर हे जिल्हा सहाय्यक समन्वयक म्हणून काम पाहत आहेत. प्रत्यक्ष सर्वेक्षणासाठी क्षत्रिय अन्वेषक (fild investigator) व निरीक्षक (observer यांची नेमणूक करण्यात आली आहे. यासाठी २६ नोव्हेंबर २०२४ रोजी प्रत्यक्ष परख सर्वेक्षण घेणाऱ्या क्षत्रिय अन्वेषकांची २९ नोव्हेंबर २०२४ रोजी परख सर्वेक्षण ज्या शाळेमध्ये होणार आहे. त्या शाळेतीत मुख्याध्यापकांची मार्गदर्शन कार्यशाळा घेण्यात आली.

या सर्वेक्षणात ४ डिसेंबर २०२४ रोजी इयत्ता ३ री व ६ वी साठी सकाळी ११ ते १२ : ३० या वेळेत तर इयत्ता ९ वी साठी सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत संपादनूक चाचणी भरून घेतली जाणार आहे. तसेच शिक्षकांकडून शिक्षक प्रश्नावली (Teacher Questionae) व मुख्याध्यापकांकडून शाळा प्रश्नावली (School Questionary) भरून घेतली जाणार आहे.

सर्वेक्षणामार्फत जिल्हा, राज्य व देशाचे शैक्षणिक आरोग्य लक्षात येणार असून पुढील प्रगतीसाठी आवश्यक सूचना तयार करण्यात येणार आहेत. धाराशिव जिल्ह्यात परख राष्ट्रीय सर्वेक्षण -२०२४ करीता मूल्यांकन करण्याकरिता इयत्तानिहाय व तालुकानिहाय शाळा संख्या पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहे.

धाराशिव जिल्हा -१३४ शाळा, एकूण क्षेत्रीय अन्वेषक संख्या- १७७, यामध्ये इयत्ता ३ री ४३,क्षेत्रीय अन्वेषक-८६, इयत्ता ६ वी ४२,क्षेत्रीय अन्वेषक-४२, इयत्ता ९ वी अशा एकूण १३४ वर्गाचा समावेश आहे.धाराशिव तालुका-एकूण ३६ शाळा यामध्ये इयत्ता ३ री १५,इयत्ता ६ वी ६,इयत्ता ९ वी-१५ एकूण क्षेत्रीय अन्वेषक -५१, तुळजापूर तालुका - एकूण २२ शाळा. इयत्ता-३ री-६, इयत्ता-६ वी-८, इयत्ता ९वी -८, एकूण क्षेत्रीय अन्वेषक- २८,उमरगा तालुका-एकूण २९ शाळा, इयत्ता-३ री-८, इयत्ता-६ वी -१०, इयत्ता ९ वी -११ एकूण क्षेत्रीय अन्वेषक - ३७ इतकी आहे.

वाशी तालुका-एकूण -३ शाळा, इयत्ता-३ री-१,इयत्ता -६ वी -१,इयत्ता ९ वी -१,एकूण क्षेत्रीय अन्वेषक- ४ लोहारा तालुका-एकूण ८ शाळा,इयत्ता-३ री-३, इयत्ता-६ वी-३,इयत्ता ९ वी-२,एकूण क्षेत्रीय अन्वेषक संख्या-११ आहे.भूम तालुका एकूण -१३ शाळा, इयत्ता ३ री-३,इयत्ता-६ वी-६,इयत्ता ९ वी -४ एकूण क्षेत्रीय अन्वेषक संख्या -१६ आहे.

कळंब तालुका-एकूण - १२ शाळा,इयत्ता-३ री-५, इयत्ता-६ वी -४,इयत्ता ९ वी -३ एकूण क्षेत्रीय अन्वेषक संख्या-१७ आहे.परंडा तालुका-एकूण -११ शाळा, इयत्ता-३ री-२,इयत्ता-६ वी -४, इयत्ता ९ वी -५ एकूण क्षेत्रीय अन्वेषक संख्या-१३ असे आहेत.

धाराशिव तालुका- ३६,तुळजापूर तालुका- २२,उमरगा तालुका- २९, वाशी तालुका- ३,लोहारा तालुका - ८, भूम तालुका- १३,कळंब तालुका- १२, परंडा तालुका- ११,एकूण १३४ शाळातील इयत्ता ३,इयत्ता ६ वी आणि इयत्ता ९ वीच्या विद्यार्थ्यांचे परख सर्वेक्षणातून त्यांच्या क्षमतांचे मूल्यांकन करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था धाराशिवचे प्राचार्य डॉ.दयानंद जटनुरे यांनी दिली.

# किन्हवली पोलीस ठाण्याची कौतुकास्पद कामगिरी

## पोलीस पाटलांनी उत्तम कामगिरीचं कौतुक करत पोलीस अधिकाऱ्यांचा केला सन्मान

**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.०३, शहापूर (ठाणे) :** मुसळधार पावसाचा आणि काळोख्या रात्रीचा आधार घेत किन्हवली परिसरात चोरी करण्याचे प्रमाण वाढले होते. चोरांनी परिसरात अक्षरशः धुमाकुळ घातला होता. रोज रात्री चोरीची एक तरी घटना घडत असे. सराईत चोर मुसळधार पावसात काळोख्या रात्रीचा फायदा घेत राजरोसपणे चोऱ्या करत होते.

खरीड, मळेगाव, भादाणे, सोगाव, ठुणे अशा अनेक गावातील शाळा आणि घरफोड्या झाल्या होत्या. रोज होणा-या चोरीच्या घटनांमुळे गावागातील नागरीक हैराण झाले होते. किन्हवली पोलीस स्टेशनचे स.पो.नि. नितिन खैरनार यांच्या नेतृत्वाखाली पोलीस स्टेशनची संपूर्ण टीम चोरांना पकडण्यासाठी अहोरात्र मेहनत घेत होती. चोर सराईत असल्यामुळे पुराव्या अभावी चोरांचा मागमुस लागणे कठीण जात होते. परंतु तपास अधिका-यांनी हार न मानता घटनांच्या मुळाशी जाऊन चोरांचा कायमचा बंदोबस्त केला आणि चोरीच्या घटनांना कायमचा आळा बसविला.



तपास करणाऱ्या संपुर्ण टीम चे परिसरातून विशेष कौतुक होत आहे.याकामी स.पो.नि.नितीनजी खैरनार,पी.एस.आय रामेश्वर तळेकर, पो.हवालदार गणेश पवार, अर्जुन पारधी, सचिन चोरघे, विक्रांत महाजन, नवनाथ गवारी, जगदीश देसले,सतिष शेलवले, प्रवीण मोहपे अशा पोलीस कर्मचाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली. किन्हवली पो. स्टे. हद्दीतील पोलीस पाटलांनी तपास अधिकाऱ्यांच्या उत्तम कामगिरीचे कौतुक करत स.पो. नि.नितीन खैरनार आणि संपुर्ण टीमला सन्मानपत्र देऊन सन्मानित केले.स.पो. नि.नितिन खैरनार यांच्या नेतृत्वाखाली संपुर्ण टीमने किन्हवली परिसरात घडलेल्या चोरीच्या घटनांचा तात्काळ आणि योग्य दिशेने तपास करत वेळीच चोरांच्या मुसक्या आवळल्या आणि घटनांना योग्य न्याय दिला. पोलिसांच्या ह्या कौतुकास्पद कामगिरीचा आम्हांला सार्थ अभिमान वाटतो.

# नवी मुंबई ग्लोबल गोल्ड टॅलेंट बुक ऑफ रेकॉर्ड यांच्यामार्फत विविध पुरस्कार जाहीर

**अक्षराज : आदिनाथ देशमुख**

**दि.०३, नवी मुंबई :** नवी मुंबई येथील ग्लोबल गोल्ड टॅलेन्ट बुक ऑफ रेकॉर्ड तुर्फे महात्मा जोतीराव फुले यांच्या पुण्यतिथी निमित राष्ट्रस्तरीय महात्मा जोतीराव फुले आदर्श शिक्षक पुरस्कार, समाजभुषण पुरस्कार व महाराष्ट्र रत्न पुरस्कार जाहीर झालेले असून पुरस्कार वितरण सोहळा रविवार, दि.०८ डिसेंबर २०२४ रोजी आगरी समाज मंगल कार्यालय, कामोठे येथे प्रमुख पाहुण्याच्या हस्ते सपन्न होणार आहे.

या पुरस्कार सोहळ्यासाठी महाराष्ट्रातून ८३० अर्ज प्राप्त झाले होते. त्यातून ६० विविध क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. पुरस्कार स्वरूप सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, आकर्षक मेडल व पुस्तक देवून सन्मानित करण्यात येणार आहे, असे आयोजक संस्थेच्या

GLOBAL GOLD TALENT
BOOK OF RECORD

संचालिका मेघा महाजन यांनी सांगितले. पुढील पुरस्कार प्राप्त मान्यवरांच्या नावांची घोषणा यावेळी बोलतांना त्यांनी केली.

महात्मा जोतिराव फुले आदर्श शिक्षक पुरस्कार - डॉ. लक्ष्मण रामजी राठोड, शोभा हर्षल चौधरी, धनराज सदाशिव माने, पुष्पलता त्र्यंबक गावंडे, सरिता बाबुराव जयपुरकर, सादिका इकबाल नागजी, स्मिता नंदकिशोर शिपुरकर डॉ. बबलू श्रीराम तायडे, गौतम दामोधर पळघामोल, राधिका कुसुरकर वाघ, सुभाष बन्सी साळवे, कांचन गावंडे/मुकुंद, गजानन रमेश गायकवाड, पूनम गजानन गायकवाड, श्रेयस श्रीराम जी डाबरे, शारदा प्रकाश राणा, सोनल अश्विनकुमार शुक्ल, विजयकुमार किसन भुजबळ,

दिपा बाबासाहेब कांबळे, पुष्पेंद्र विक्रमराव पाटील, काश्मीरा आश्विन शुक्ला, विजय दामजीभाई वाघेला, सुभाष राजाराम गवळी, संजना संतोष चव्हाण, मोहम्मद जाकीर अब्दुल करीम, अब्दुल मतीन अब्दुल गनी, गुलाम मुस्तफा खान, बिस्मिल्लाह खान, शगुप्ता खानम गुलाम रसूल, नागेश पाटील, नुरी गुलाम मोहम्मद मुस्तफा, पूनम विजयकुमार भुजबळ, शकील अहमद शेख अय्यूब पिंजारी, कलावती सुरेश पहुरकर.श्रीकांत यशवंत पराड

महात्मा जोतीराव फुले महाराष्ट्र रत्न पुरस्कार - विनोद तुकाराम भंगाळे, डॉ. गजानन सिताराम शेपाळ, बिजाक्षी नारायण राय /हेगडे परशुराम हरिदास घाडगे, प्रेमदास जानकिराम राठोड, शरद रघुनाथ फुंदे, रत्नकांत अनंतराव विचारे, डॉ.संतोष दामोदर पेठे, राजेश प्रल्हादराव घायल, शौर्य आमोल शहाळे,

अशोक विश्राम जाधव, इंद्रनील साहेबराव भामरे, श्रीमती गिता गणेश मेश्राम,चंद्रशेखर धनु जाधव, उल्हास बाबाराव देशमुख, प्रा.सुरेखा दंडारे-वसेकर, विजय भागवत पाटील, महादेव नारायण गायकर, अदिती अतुल कुलकर्णी, रवींद्र धनराज पाटील, दीपिका पंढरीनाथ पवार,अशोक काशिनाथ अमृतसागर, मोहम्मद जाकीर मोहम्मद कासम.

महात्मा जोतीराव फुले समाजभूषण पुरस्कार - निलेश बाळाराम पाटील, दत्ता श्रावण खंदारे, रमेश तुकाराम झगडे, डॉ. शंकर भगवान सा शहाळे, दिलीप भिवाजी नारद.उज्वला पाटील

# थोडक्यात

## शिराढोण परिसरात अज्ञात हिंस्र प्राण्यांच्या धास्तीने रस्ते सामसूम

**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.०३, कळंब (धाराशिव) :** कळंब तालुक्यातील हसेगाव (शि.) शिवारात गौरगाव येथील शेतकऱ्यांच्या एका गाय व बैलाच्या नरडीचा घोट घेत अज्ञात हिंस्र वन्य प्राण्याने जीव घेतला. घटनास्थळी वनविभागाच्या पथकाने भेट दिली असून परिसरात खळबळ उडाली आहे. गौरगाव येथील हनुमंत धोंडीराम बोळके याचे लगतच्या हसेगाव (शि.) शिवारात सर्वे क्रमांक २३२ मध्ये जमीन आहे. सदर शेतातील बोळके यांचा पशुधनाचा गोठा आहे. त्यात आपल्या पशुधनास नियमित बांधत असत. शनिवार, दिनांक ३० नोव्हेंबर २०२४ रोजी सायंकाळी त्यांनी आपले पशुधन गोठ्याच्या बाहेर बांधून घर गाठले होते. रविवार, दिनांक ०१ डिसेंबर २०२४ रोजी शेतात गेल्यावर मात्र यापैकी एका ५ वर्षीय गाईचा व ३ वर्षीय बैलाचा अज्ञात हिंस्र प्राणी आणि नरडीचा घोट घेत बळी घेतल्याचे निदर्शनास आले. यानंतर याची माहिती वन विभागाला देण्यात आली. वन परिमंडळ अधिकारी डी.व्ही.फरताडे, वनरक्षक सतीश साळुंखे, सरपंच सचिन कापसे, श्याम कापसे व शिराढोण पोलीस, कोतवाल अन्य काही नागरिक घटनास्थळी दाखल झाले. वन विभागाच्या पथकाने पाहणी केली. काही निरीक्षणे नोंदवली. त्यानंतर निपाणी येथील पशुवैद्यकीय अधिकारी दत्तात्रय आवळे यांनी शेवविच्छेदन केले. तलाठी व ग्रामसेवक मात्र अनुपस्थितीत होते. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. यामुळे शिराढोण परिसरात अज्ञात हिंस्र प्राण्यांच्या धास्तीने रस्ते भीतीने सकाळी मॉर्निंग वॉक करणाऱ्या नागरीकांची संख्या रोडावल्याने रस्ते सामसूम झाले आहेत.

## वूई टुगेदर फाउंडेशनचा नि:स्वार्थी उपक्रम

**अक्षराज : सरिता डोंगरे**

**दि.03, चिंचवड (पुणे) :** विकास अनाथ आश्रम, चिखली येथे संगणक आणि आवश्यक अंतर्वस्त्रे वितरण उपक्रम राबवण्यात आला. वुई टुगेदर फाउंडेशन, पिंपरी चिंचवड या सेवाभावी संस्थेच्या वतीने सोनावणे वस्ती, चिखली येथील विकास अनाथ आश्रम येथील ५५ मुलामुलींना अनेक वर्षापासून कायम नि:स्वार्थी मदतीचा हात असतो.




यावेळी आणखी एक वेगळा उपक्रम म्हणून येथिल मुला मुलींना लागणारी आवश्यक अंतर्वस्त्रे आणि संगणक प्रदान करण्याचा कार्यक्रम (दि. १ डिसेंबर) आयोजित करण्यात आला होता. काळेवाडी येथील सामाजिक कार्यकर्ते रविंद्र इंगळे, अनिल पोरे, सीता केंद्रे व जयंत देशमुख, अतुल शेठ यांनी या उपक्रमासाठी मोठा हातभार लावला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ.कैलास जोरूले, अस्थिरोग तज्ज्ञ, बिर्ला हॉस्पिटल, डॉ.अमृता सहस्रबुद्धे - जोरूले उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन सोनाली मन्हास यांनी केले, प्रस्ताविक माऊली हारकळ यांनी केले. संस्थेचे अध्यक्ष सलीम सय्यद यांनी वुई टुगेदर फाउंडेशनच्या कार्याची माहिती दिली. निस्वार्थी समाजसेवेचा वसा घेतलेल्या आदर्श शिक्षिका मंगला डोळे - सपकाळे यांनी मनोगत व्यक्त करून आभार मानले. या कार्यक्रमात पाहुणे आणि पदाधिकारी यांचे हस्ते मुलांना आवश्यक कपडे, फळे, संगणक वितरण करण्यात आले. वुई टुगेदर फाउंडेशनचे सल्लागार मधुकर बच्चे,अध्यक्ष:सलीम सय्यद, जयंत कुलकर्णी, सरिता जयंत कुलकर्णी, मैमुना सय्यद, साधना बापट, श्रीनिवास जोशी, विलास गटणे, दिलीप चक्रे, अनिल पोरे,धनराज गवळी, अतुल शहा, रविंद्र इंगळे, रोहित वैद्य, के. रंगाराव, अर्जुन पाटोळे, जी आर चौधरी, क्रांतीकुमार कडुलकर, दिलीप पेटकर, दारासिंग मन्हास, मंगला डोळे - सपकाळे आदी पदाधिकारी, सदस्य यावेळी उपस्थित होते.

## महापालिकेच्या अग्निशमन अधिकारी, कर्मचाऱ्यांना जलीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०३, पनवेल :** महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत पद भरती झालेल्या नवनियुक्त २० अधिकारी व कर्मचाऱ्यांना जलीय आपत्ती व्यवस्थापनाच्या प्रशिक्षणाकरिता आयटीयुएस (इंडियन रेस्कयू अॅकेडमी) या खाजगी संस्थेमार्फत कोलाड या ठिकाणी २० दिवसांकरिता प्रशिक्षण देण्यासाठी प्राधिकृत करण्यात आले होते. हे प्रशिक्षण यशस्वीपणे पुर्ण करून आलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना आयुक्त मंगेश चितळे यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी उपायुक्त कैलास गावडे, मुख्य अग्निशमन अधिकारी प्रवीण बोडखे, सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, अग्निशमन अधिकारी हरिदास सुर्यवंशी, उप अग्निशमन केंद्र अधिकारी संदीप पाटील, प्रशिक्षणार्थी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात नदी, तलाव, पॉण्ड असे विविध जलस्त्रोत आहेत तसेच पावसाचे प्रमाणही जास्त आहे अशा परिस्थितीत काही आपत्ती घडल्यास बचाव कार्य करता यावे यासाठी अग्निशमनच्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना जलीय आपत्तीचे निवारण प्रशिक्षण देणे महत्वाचे होते. यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनूसार नव्याने पदभरती झालेल्या २ अधिकारी व १८ कर्मचाऱ्यांना आयटीएस कोलाड येथे अद्यावत प्रशिक्षण देण्यासाठी प्राधिकृत करण्यात आले होते. महापालिकेच्या वतीने उर्वरीत कर्मचाऱ्यांना देखील टप्प्याटप्प्याने जलीय आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. पनवेल महापालिकेच्या वतीने जास्तीत जास्त चांगल्या सोयी सुविधा देण्यावरती नेहमीच भर देण्यात येत असतो. येत्या काळात या प्रशिक्षणा बरोबरच इतर आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण ही अग्निशमनच्या नव्याने आलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना महापालिकेच्यावतीने देण्यात येणार आहे.

## राज्यस्तरीय मल्लखांब स्पर्धेत राजेंद्र उच्च माध्यमिक विद्यालयाचे उज्वल यश

**अक्षराज : धर्मेंद्र वर्पे**

**खंडाळा (सातारा) :** नुकतेच क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी मुंबई उपनगर बोरीवली यांचे संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय मल्लखांब स्पर्धेतून खंडाळा विभाग शिक्षण समितीचे राजेंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय खंडाळा व भाग शाळा बावडा विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन उज्वल यश संपादन केले.

या स्पर्धेमध्ये १४ वर्षाखालील मुली कु.समीक्षा अभिजीत पवार द्वितीय क्रमांक चॅम्पियनशिप, १४ वर्षाखालील मुले सार्थक नितीन पवार तृतीय क्रमांक चॅम्पियनशिप, १७ वर्षाखालील मुले अथर्व भगवान भिसे प्रथम क्रमांक चॅम्पियनशिप,



१९ वर्षाखालील मुले शीतलकुमार महेश पवार तृतीय क्रमांक चॅम्पियनशिप वरील विद्यार्थ्यांनी शालेय राज्यस्तरीय स्पर्धेत चॅम्पियनशिप प्रमाणपत्र, सहभाग प्रमाणपत्र, मिडल मिळवून चांगली कामगिरी केली.

या विद्यार्थ्यांचा सत्कार करत असताना विद्यालयाचे प्राचार्य शब्बीर नालबंद यांनी यशस्वी विद्यार्थ्यांनी राजेंद्र विद्यालयाचे नाव उज्वल केले याबद्दल विद्यालयाच्या वतीने त्यांचे विशेष कौतुक केले. या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे बावडा गावचे मलखांब प्रशिक्षक ग.म.पवार गुरुजी यांनी विद्यार्थ्यांना यशस्वी वाटचालीसाठी योग्य ते मार्गदर्शन केले. तसेच या खेळाडूंना मार्गदर्शन करणारे क्रीडाशिक्षक व्ही. एन.गाढवे, बी.ई.धर्माधिकारी, राऊत व प्रशिक्षक महेंद्र पवार,पवार गुरुजी यांचे मार्गदर्शन लाभले.

या उज्वल यशासाठी खंडाळा विभाग शिक्षण समिती खंडाळा संस्थेचे अध्यक्ष शंकरराव गाढवे, सचिव अनिरुद्ध गाढवे व सर्व संचालक मंडळ, विद्यालयाचे प्राचार्य शब्बीर नालबंद, उपप्राचार्या अरुंधती गाढवे, उपमुख्याध्यापिका सुशीला मोहिते, पर्यवेक्षक धनंजय महामुनी व व्हि.जे.चौधरी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.